# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव. दि.३ ( ) लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान हा एकमेव महत्वाचा पर्याय असून नवमतदारांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार नावनोंदणीसाठी पुढाकार घ्यावा असे आावाहन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित नवमतदार नोंदणी जागृती अभियानाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मतदार नोंदणी अधिकारी तथा एरंडोलचे उपविभागीय अधिकारी श्री.विजयानंद शर्मा आणि धरणगावचे तहसिलदार चंद्रजित राजपूत उपस्थित होते. कुलगुरु म्हणाले की, मतदानाची घटत जाणारी टक्केवारी हा चिंतेचा विषय असून जिल्हा प्रशासन नवमतदारांच्या नोंदणीसाठी पुढाकार घेत आहे. या मोहिमेला तरुणांनी सहकार्य करुन मतदार यादीत आपले नाव नोंदवून घ्यावे असे आवाहन त्यांनी केले.

विजयानंद शर्मा म्हणाले की, भारतात मतदानापासून दूर राहणारा वर्ग चाळीस कोटीच्या घरात आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. मतदान हा सगळयांचा हक्क आहे. एवढया मोठया संख्येने मतदानापासून दूर राहणे ही बाब अभिमानास्पद नाही तर लोकशाही प्रक्रियेला खिळखिळी करणारी आहे. तेव्हा १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवतरुणांनी मतदार नोंदणी करुन घ्यावी असे ते म्हणाले. प्रारंभी जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले व शेवटी आभार मानले. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत दिवसभर नवमतदारांची नोंदणी करण्यात आली.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. ३ ( ) आता पुणे येथे उद्योजक असलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या काही माजी विद्यार्थ्यांनी बुधवारी उद्योजक होण्याच्या टिप्स् देत आपल्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव कथन करत विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

पुणे येथील पिटासिस् या सॉफ्टवेअर कंपनीची सध्याची वार्षिक उलाढाल २६० कोटी रुपयांची आहे. विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेचा माजी विद्यार्थी उत्कर्ष दाभाडे यांनी ही कंपनी स्थापन केली. विशेष म्हणजे या कंपनीत परिसर मुलाखतीद्वारे या विद्यापीठातील विद्यार्थ्यांची नियुक्ती केली जाते. खान्देशातीलच व या प्रशाळेतील माजी विद्यार्थी सचिन भावसार, दिपक गिरी, मोहन पाटील, जितेंद्र पाटील आणि ललित कोलते हे पाच माजी विद्यार्थी काही वर्षांपूर्वी पिटासिस् या कंपनीत दाखल झाले आणि पुढे श्री.दाभाडे यांच्या समवेत भागीदार झाले. त्यांनी विकसित केलेल्या ऑल माईल्स् या सॉफ्टवेअरद्वारे ६५ हजार लोक आज वाहतुकीच्या सुविधेचा लाभ घेतात. या सर्व सहा माजी विद्यार्थ्यांनी सिनेट सभागृहात आजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या उद्योजकीय प्रवासाचे अनुभव कथन केले. उद्योजक होण्यासाठी मेहनतीची तयारी ठेवा, चिकाटी आणि जिद्द यातूनच यश प्राप्त होऊ शकते. खान्देशातील विद्यार्थी संभाषण कौशल्यात कमी पडतात मात्र परिश्रम आणि प्रामाणिकपणा हे त्यांचे गुण उल्लेखनीय असल्याचे सांगून श्री.दाभाडे यांनी आज प्राप्त झालेल्या यशात विद्यापीठाचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले.

यावेळी मंचावर कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा.बी.व्ही.पवार उपस्थित होते. संध्या भिडे यांनी सुत्रसंचालन केले व आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ०३ ऑक्टोबर, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी